
महाराष्ट्र जनुक कोश

# महाराष्ट्रातील पक्षी



CEE
Centre for Environment Education

# पक्ष्यांच्या वर्णनासाठी शरीराचे भाग




क्रिएटिव्ह कॉमन्स अट्रीब्यूट नॉन कमर्शिअयल शेयर अलाईक: हि सामग्री गैर–व्यापारी उपयोगांसाठी मूळ स्रोताचा उल्लेख करून आपण मुक्तपणे वापरू शकता. यापासून बनवलेल्या सामग्रीचा उपयोग इतरांनाही तितक्याच मुक्तपणे करू द्यावा

CC BY NC SA

# पक्ष्यांच्या पायांचे प्रकार



जमिनीवरुन
चालण्यासाठी,
पळण्यासाठी



पोहण्यासाठी



भक्ष्य पकडण्यासाठी




भक्ष्य पकडण्यासाठी




दलदलीवरुन सहजतेने
पळण्यासाठी

# पक्ष्यांच्या चोचीचे प्रकार




चिरफाड करण्यासाठी




फुलांमधला मकरंद पिण्यासाठी



मांस फाडण्यासाठी



दाणे किंवा बिया फोडण्यासाठी



लाकूड पोखरण्यासाठी



चिखलातलं खाद्य
गोळा करण्यासाठी

# पक्षी

पक्ष्यांचे विशेष म्हणजे गरम रक्ताचे, पाठीचा कणा, पंख, पिसे, चोच आणि दोन पाय. पक्ष्यांचे पूर्वज पंख असलेले, उडणारे डायनोसॉर होते. तशा प्रकारचे भक्कम पुरावे काही अवशेष स्वरुपात जर्मनी, चीनमध्ये सापडले आहेत. हे पक्ष्यांचे पूर्वज साधारण १५ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर होते. जशी उत्क्रांती होत गेली तसे पक्ष्यांमध्ये अनेक बदल झाले. आज वैज्ञानिकांनी पक्षांची दोन मोठ्या गटात विभागणी केली आहे. एका गटात पंख असलेले पण न उडणारे पक्षी येतात, जसे की ऑस्ट्रीच, किवी, इमू पक्षी वगैरे आणि दुसऱ्या गटात बाकी सर्व उडणारे पक्षी.

भारतात सुमारे १,२५० हजार प्रजातींची आणि त्यापैकी महाराष्ट्रात ५४० प्रजातींची नोंद आहे. नवीन पक्षी शोधणे ही खूप दुर्मीळ गोष्ट आहे. १९४७ पासून आजपर्यंत देशात फक्त ४ नवीन पक्ष्यांचा शोध लागला आहे. अलीकडे म्हणजे २००६ आणि २०१६ साली अरुणाचल प्रदेशातून विज्ञानाला माहित नसणाऱ्या २ नवीन पक्ष्यांची नोंद झाली. आज पक्षी बघणे हा मोठा लोकप्रिय छंद आहे. अमुक भागात कोणकोणते पक्षी आहेत यांची बरीच माहिती आज उपलब्ध असली तरी पक्षी आणि वनस्पती, पक्षी आणि किडे यांचे परस्पर संबंध, अनेक प्रकारच्या पक्ष्यांमधले आपापसातले संबंध, हवामान बदलामुळे त्यांच्या सवयींवर होणारे परिणाम याबद्दल खूप कमी माहिती उपलब्ध आहे.

निसर्गात पक्षी हे किटकांवर नियंत्रण, उपद्रवी प्राण्यांचा नाश करणारे व बीज प्रसारक म्हणून महत्वाच्या भूमिका बजावतात. वड, पिंपळ, जांभूळ, अंजिराच्या बिया धनेश, तांबट, हळद्या या पक्ष्यांच्या विष्ठेतून खाली पडल्या की चांगल्या रुजतात. बगळे, बलाक, कोतवाल, बुलबुल हे पक्षी शेतातील कीड खातात.

# पुस्तिकेबद्दल


शाळापातळीवर गाव परिसरातील पक्षी आणि त्यांची विविधता शोधण्याच्या अभ्यासाची सुरवात म्हणून शिवार भेट करताना उपयोगी अशी ही पुस्तिका बनवली आहे. शोधायला सोपे व्हावे म्हणून पक्षांची १. पाणथळ जागा २. माळरान आणि काटेरी झाडाझुडपांचा प्रदेश ३. शेतीचा परिसर ४. परसबागेतील पक्षी ५. वनक्षेत्र ६. संकटग्रस्त आणि दुर्मीळ पक्षी अशी विभागणी केली आहे.

# पक्ष्यांचे स्थलांतर

पृथ्वीवर एकाच वेळी उत्तर आणि दक्षिण गोलार्धात वेगवेगळे हंगाम आणि तापमान असते. याचा फायदा घेऊन अनेक पक्ष्यांच्या प्रजाती आपल्या राहण्याच्या जागा काही महिन्यांसाठी बदलतात. अशाने त्यांना प्रत्येक हंगामात पुरेसे अन्न आणि घरटी करण्यासाठी चांगल्या जागा मिळतात.

अनेक पक्षी उत्तर गोलार्धातून दक्षिणेकडे हजारो किलोमीटर प्रवास करून येतात. उत्तरेकडे कडक थंडी व बर्फ पडल्यामुळे खायला काही मिळत नाही, त्यामुळे उबदार जागा आणि खाण्याच्या शोधात पक्षी दक्षिणेला येतात. साधारण नोव्हेंबर ते मार्च या महिन्यात विविध पाणपक्षी व माळावरचे पक्षी स्थलांतर करतात. धोबी, फ्लेमिंगो, चक्रांग व थापट्या बदक हे पक्षी हिमालय, आफ्रिका, सायबेरिया व युरोपमधून महाराष्ट्रात आणि भारतात या महिन्यांमध्ये येतात.

काही पक्षी जवळपासच्या भागात 'स्थानिक स्थलांतर' करतात. उदाहरणार्थ राखी धनेश त्याच्या आवडत्या फळझाडांच्या शोधात एका गावातून दुसऱ्या गावात असे स्थानिक स्थलांतर करतो.



## पाणथळ जागा

दलदली, नद्या, ओढे –नाले, तलाव, खाड्या, समुद्र, मिठागारे अशा उथळ पाणी आणि पाणवनस्पतीची असणाऱ्या पाणथळ जागी अनेक स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात दिसतात. पाण्यावरती तरंगणारे किडे, मासे, काठावरच्या ओलसर मातीत राहणारे गांडूळ, शंख शिंपले आणि इतर किडे हे सर्व त्यांचं खाद्य असते. अशा ठिकाणी राहणाऱ्या पक्ष्यांचे वैशिष्ट्य म्हणेज त्यांचे लांब, बारीक पाय ज्यांनी चिखलात, दलदलीत चालायला जमतं आणि लांब टोकदार चोची ज्याने चिखलातून किडे, अळ्या असं खाणं उकरून काढता येतं. पाणथळ जागी वाढणारे उंच गवत, इतर पाणवनस्पती वापरून शराटी आणि पाणकोंबडी आपली घरटी करतात. हिवाळ्यात पक्षी निरीक्षणासाठी पाणथळ जागा सगळ्यात चांगल्या मानल्या जातात कारण या काळात एकाच ठिकाणी स्थलांतरित आणि स्थानिक पक्ष्यांच्या २५–३० प्रजाती सहज बघायला मिळू शकतात.




Nitesh Parulekar

## शेकाट्या
## Black winged stilt

हिवाळी स्थलांतर


हा पक्षी गटाराचे मैलापाणी, सांडपाणी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सापडतो.


Wikimedia

## नदीसुरय
## River tern

स्थानिक भटकंती

सुरय या शब्दाचा अर्थ डौलदार उडणारा असा आहे. सूर मारून मासे पकडण्यात पटाईत.


Ruturaj Joshi

## प्लवा बदक
## Spot billed duck

स्थानिक भटकंती

भारतातील सर्वात मोठे बदक. त्याच्या चोचीच्या टोकावर पिवळा व डोळा–चोचीमध्ये पिवळा केशरी रंगाचा ठिपका असतो.



Wikimedia

## तलवार बदक
## Northern pintail

सायबेरियामधून हिवाळी स्थलांतर.

याचे शरीर निमुळते व शेपटी लांब तलवारीसारखी असते.



Wikimedia

## लालसरी
## Common pochard

हिवाळी स्थलांतर

नराचे लालसर चॉकलेटी डोके असून, काळी छाती व पोट– पाठ पांढरी असते. मादीत असे तीन ठळक रंग दिसत नाहीत.



Wikimedia

## चक्रवाक
## Ruddy shelduck
## Brahminy duck

हिवाळी  स्थलांतर

हिमालयामध्ये प्रजनन होते. मातकट नारंगी रंगाची ही बदके थव्यांनी स्थलांतर करतात.



Wikimedia

## कानूक
## Cotton teal

स्थानिक भटकंती

भारतात आढळणारे सर्वात लहान बदक



Wikimedia

## करडा धोबी
## Grey wagtail

हिवाळी स्थलांतर

या धोब्याची एक जात हिमालयातून स्थलांतर करून सुमारे दोन हजार किलोमीटर एवढे अंतर कापून हिवाळ्यात महाराष्ट्रात येते.




Wikimedia

## पिवळा धोबी
## Yellow wagtail

स्थानिक भटकंती

धोबी जसा हातातील कपडा वरखाली करून दगडावर आपटतो त्याप्रमाणे हा पक्षी जमिनीवर भक्ष्य शोधत चालताना आपली शेपटी वरखाली करतो.



Nitesh parulekar

## रंगीत करकोचा

## Painted stork

स्थानिक स्थलांतर

उथळ पाण्यात उतरून मासे, बेडूक, पाणसाप हे खाद्य शोधण्यात पटाईत. आराम करतो तेव्हा कुबड काढून दोन पायांवर स्तब्ध उभा असतो.



Nitesh parulekar

## तुतारी

## Common sandpiper

हिवाळी  स्थलांतर

पंखांचा वरील भाग करडा तपकिरी, शेपटीखालील भाग तपकिरी, पोट पांढरे, तर पाय हे पिवळसर तपकिरी रंगाचे असतात.



Nitesh parulekar

## पाणकावळा

## Little cormorant

स्थानिक भटकंती

जलाशयाजवळ फांद्यांवर, खडकांवर विशिष्ट पध्दतीने पंख वाळवित बसलेला दिसतो. पंखांवर तैलग्रंथी नसतात.



Wikimedia

## सापमान्या

## Oriental darter

स्थानिक भटकंती

वैशिष्ट्यपूर्ण सापासारखी मान, संकटग्रस्त प्रजाती



Wikimedia

## राखी बगळा

## Grey heron

स्थानिक भटकंती

जलाशयावर एका जागी निश्चल उभा राहिलेला आढळतो.



Wikimedia

## जांभळा बगळा

## Purple heron

स्थानिक भटकंती

घनदाट पाणवनस्पतींच्या जागी निश्चिल उभा व सहज न दिसणारा.



Aparajita

## कॉमन पोंड हेरॉन

## Indian Pond Heron

रहिवासी, स्थानिक भटकंती

लांब पिवळ्या चोचीच्या शेवटी काळा रंग. छोटी मान, खांदे वर करून बसल्यासारखा दिसतो.



Wikimedia

## चमचा पक्षी

## Eurasian spoonbill

स्थानिक भटकंती

वैशिष्ट्यपूर्ण चमचासारखी चोच, सकाळी व संध्याकाळी अन्नाच्या शोधात सक्रीय.



Wikimedia

## लहान बगळा

## Little egret

स्थानिक भटकंती

पिवळी चोच, काळे पाय, पिवळी बोटे.


Wikimedia

## दलदल ससाणा
## Marsh harrier

हिवाळी आंतरराष्ट्रीय स्थलांतर


युरोपमधून येणारा, मोठ्या जलाशयांवर आढळणारा स्थलांतरीत पक्षी.


Wikimedia

## ऑस्प्रे
## Osprey

युरोपातून हिवाळी स्थलांतर,


संकटग्रस्त होण्याच्या मार्गावर. मोठ्या तळ्यांवर मासेमारी करतो.


Wikimedia

## चक्रांग
## Common teal (Eurasian teal)

हिवाळी स्थलांतर

हे एक हिवाळी स्थलांतरीत बदक आहे. उत्तर युरोप व सौदी अरेबियातून हे भारतात येतात.




Wikimedia

## भुवई

## Garganey duck

हिवाळी स्थलांतर

नराच्या डोक्याला डोळ्यापासून जाड भुवईसारखी पांढरी पट्टी. छाती व पोटाकडील भाग तपकिरी व पांढरट अशा स्पष्ट दोन पट्ट्यात विभागलेला असतो.




Wikimedia

## थापट्या

## Northern shoveller

हिवाळी स्थलांतर

लांब पसरट आणि चकचकीत काळ्या रंगाच्या वैशिष्ट्यपूर्ण चोचीमुळे ओळखून येतो. नराचे डोके चमकणाऱ्या हिरव्या रंगाचे तर छाती पांढरी, वरील पंख फिक्कट निळसर रंगाचे असतात.



Wikimedia

## अडई

## Lesser whistling duck

स्थानिक भटकंती

पाणवनस्पतींनी भरलेल्या तलावात किंवा दलदलीच्या शेतामधून हे पक्षी १०–१५ पक्ष्यांच्या समूहाने राहतात.



Wikimedia

## टिबुकली

Little grebe

स्थानिक भटकंती

हा पक्षी पाण्यात डुबी मारण्यात अगदी पटाईत आहे. कारण डुबी मारलेल्या जागी पाण्याची सूक्ष्म लहर सुध्दा दिसत नाही.



Yuvraj patil

## उघड्या चोचीचा करकोचा

Asian openbilled stork

स्थानिक भटकंती

चोचीचे दोन्ही भाग वाकलेले असल्यामुळे त्यांच्यात फट राहते. या वैशिष्ट्यपूर्ण चोचीमुळे त्याला शंख-शिंपले फोडून खाता येतात.



Harvinder - Wikimedia

## कवड्या धीवर

Pied kingfisher

स्थानिक भटकंती

कबुतराएवढा आकार. काळी चोच, काळे-पांढरे पंख, आणि डोक्यावर छोटा तुरा. पाण्याजवळ सापडतात.



1. Sankara Subramanian
2. Aparajita R.

## १. खंड्या
Small Blue Kingfisher

चिमणीपेक्षा थोडा मोठ्या आकाराचा

## २. बंड्या
White Throated Kingfisher

साळुंकीपेक्षा मोठा.

स्थानिक भटकंती

पाण्याजवळ, शिवारात, रानात सापडतात




Sudharsun Jayaraj - Wikimedia

## जांभळी पाणकोंबडी
Purple Moorhen

हिवाळी स्थलांतर

गडद निळ्या, हिरवट, जांभळ्या रंगाचे अंग. नदीकाठ, दलदली, तळी, पाणथळ ठिकाणी सापडतात. पाणवनस्पतीच्या जाड थरावर, मोठी तरंगणारी घरटी तयार करतात. सर्वभक्षक.




Dr. Tejinder Singh Rawal

## कूट/चांदवा/वारकरी/नाम्या
Common Coot

स्थानिक भटकंती

संपूर्ण काळे अंग आणि कपाळापासून चोचीपर्यंत उभा मोठा पांढरा पट्टा. सर्वभक्षक – इतर पक्ष्यांची अंडी, पाण्यातली वनस्पती, बिया, फळे खातात.


Vasanthan P. J.

## जकाना / कमळपक्षी
## Bronze winged jacana

स्थानिक भटकंती

चिखलातून, दलदलीतून चालायला उपयोगी मोठे लांब पाय, काळे शरीर, पंख तपकिरी, डोळ्यापासून भुवईसारखी पांढरी पट्टी.


Koshy Koshy Wikimedia

## काळा आयबिस / कुदळ्या
## Red Naped Ibis

रहिवासी, स्थानिक भटकंती

संपूर्ण काळे अंग, खांद्याजवळ एक पांढरा चट्टा. डोक्यावरती लाल रंगाची टोपी. पाण्यापासून लांब, शेतातदेखील सापडतो.


Wikimedia

## रोहित
## Lesser flamingo

हिवाळी स्थलांतर

आफ्रिका तसेच कच्छच्या रणातून महाराष्ट्रातील शिवडी, मायणी, ठाण्याची खाडी भिगवण इ. ठिकाणी प्रामुख्याने येतो.

## माळरान
## आणि काटेरी झाडाझुडपांचा प्रदेश

दगड–धोंड्यांचा पसारा, त्यात उगवलेले गवताचे पुंजके आणि अधून मधून दिसणारी बोर, बाभळी, खैर, तरवड, हिवर, नेपती ही झाडं अशी माळरानं महाराष्ट्रातल्या खूप मोठ्या भागात आहेत जिथं पाऊस कमी पडतो. इथं काही विशिष्ट प्रकारचे पक्षी राहतात. यात स्थानिक आणि स्थलांतरित असा दोघांचाही समावेश असतो. आकाशात कापशी शिकारीच्या शोधात तारेवर बसलेली सहज दिसते. शोधणाऱ्या डोळ्यांना कधी गवताच्या पुंजक्यात माळ–टिटवीनं अंडी घातलेली दिसतील तर कधी बटेर, तितर यांचा थवा अचानक एका झुडपांतून उडून जाताना दिसेल. गवतांच्या बिया, साप सुरळी, पाली, छोटे किडे हे इकडे रहाणाऱ्या पक्ष्यांचं खाद्य. भारतातले दोन मोठे व संकटग्रस्त पक्षी माळढोक आणि तनमोर सुध्दा अशाच गवताळ माळरानात सापडतात.




Nitesh Parulekar

## तारवाली
## Wire tailed swallow

स्थानिक भटकंती

वेगवान उडतात, पंखातून दोन लांबलचक तंतुसारखी पिसे बाहेर आलेली असतात, म्हणून तारवाली हे नाव.


Wikimedia

## गप्पीदास
## Pied bush chat

स्थानिक भटकंती

सततच्या शिळ घालण्याच्या पध्दतीमुळे हे नाव आले आहे.


Wikimedia

## भोरडी
## Rosy starling

हिवाळी स्थलांतर

सायबेरियातून हजारोंच्या संख्येने येतात. टोळ नियंत्रक म्हणून निसर्गामध्ये महत्वाची भूमिका बजावतात.



Nitesh Parulekar

## हूदहूद

## Common hoopoe

स्थानिक भटकंती

डोक्यावरील वैशिष्ट्यपूर्ण तुरा, अधूनमधून तुऱ्याची उघडझाप करतो. शेतीतले नुकसानकारक किडे खातो.



Abhijit Avalaskar

## धावीक

## Indian courser

स्थानिक भटकंती

अतिशय सावध पक्षी, दुर्मिळ आहे.



Nitesh Parulekar

## डोंबारी

## Ashy crowned sparrow lark

स्थानिक भटकंती

कसरती करत वैशिष्ट्यपूर्ण उडण्यासाठी प्रसिध्द.



Nitesh Parulekar

## खाटीक

## Rufous backed shrike

स्थानिक भटकंती

पक्ष्यांमधला नकलाकार, गरजेपेक्षा जास्त शिकार बेडूक, सरडे व पाली यांची करतो व भक्ष्य लटकवून ठेवतो.



Abhijit Avalaskar

## कंठी गप्पीदास

## Common stone chat

स्थानिक भटकंती

मोठ्या चिमणी एवढा, काळे डोके–चोच व पंख असणारा पक्षी.



Nitesh Parulekar

## कोतवाल

## Black drongo

स्थानिक भटकंती

आक्रमक स्वभावाचा, शिकारी पक्षांवर चालून जातो, छोटे पक्षी याच्या घरट्याभोवती घर बांधतात, बीज प्रसारक व कीड नियंत्रक



Nitesh Parulekar

## शिक्रा
## Shikra

हिवाळी भटकंती

दाट झाडीच्या फांदीवर बसणारा हा पक्षी भक्ष्याला धोका समजण्यापूर्वीच झडप घालून आश्चर्यकारक वेगाने भक्ष्य पकडतो.



Wikimedia

## माळटिटवी
## Yellow wattled lapwing

स्थानिक भटकंती

गवताळ माळरानावर आढळतो



Wikimedia

## लावा
## Common quail

माळरानावर आढळणारा व मोठ्या प्रमाणावर खाण्यासाठी शिकार केली जाणारा पक्षी. सह्याद्रीत साताऱ्यापासून दक्षिणेला हिवाळ्यात आढळ.


Dr.Raju Kasambe

## तुरेवाला भारीट
### crested bunting

स्थानिक

कोरड्या मोकळ्या माळरानात, खडकाळ डोंगर उतारावर सापडतात. गवत बिया, शेतातलं धान्य खातात.


Satish Awate

## तुरेवाला चंडोल
### Indian bushlark

स्थानिक. कोरड्या मोकळ्या माळरानात रहातात. गवत बिया, धान्य खातात. विणीच्या हंगामात उंच भरारी मारतो, उडताना गोड गाणी गातो. चंडोल असणं हे त्या माळरानाच्या चांगल्या स्थितीचं जैव-निर्देशक मानलं जातं.


Sumanta Pramanick- Wikimedia

## सिल्वर बील/माळ मुनिया
### Silverbill Munia

स्थानिक भटकंती

चंदेरी चोच - उन्हात एकदम चमकताना दिसते. गवतवर्गीय पिकांच्या शेतात ह्याचे घोळके सापडतात. कोरड्या माळरानाच्या प्रदेशात राहतात. सुगरण पक्ष्याचं जुनं घरटं वापरतात.



## शेतीचा परिसर

खरीपातली भातशेती, नाचणी, वरई सोयाबीन, तूर असो किंवा रब्बीतली कोरडवाहू ज्वारी–बाजरी–करडईची शेती असो, शेतात काही पक्षी कायम दिसतात. पोपट, चिमण्या, गुलाबी चिमण्या आणि भोरड्या हे पक्षी पिकांचे नुकसान करतात. पण इतर अनेक पक्षांचा शेतीला उपयोग होते. कोतवाल, वेडा राघु, हुदहुद, बुलबुल, पाकोळी वगैरे पक्षी शेतातले किडे, बेडूक, उंदीर यांना खातात. भोरड्या आणि कोतवाल पक्षी टोळ किड्यांना खातात. बगळे भात खाचरातले छोटे खेकडे खातात ज्यामुळे पावसाळ्यात भातपिकांचे नुकसान कमी होते. आंब्याच्या झाडावर सापडणाऱ्या खोडकिड्याचे (मँगस्टेम बोरर) नियंत्रण स्वर्गीय नर्तक पक्षी करतो.


Wikimedia

## गुलाबी चिमणी
## Common rose finch

हिवाळी स्थलांतर

घरटी बलुचिस्तान, काश्मिर व तिबेट येथे बांधतात सप्टेंबर महिन्यात भारतात आगमन, शेतीचे नुकसान करतात


Aparajita R.

## सुगरण
## Baya weaver

स्थानिक भटकंती

सुगरण पक्ष्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याचे घरटे एक सुंदर कलाकृती असते.


Nitesh Parulekar

## कोतवाल
## Black drongo

स्थानिक भटकंती

नाकतोडे, पंखांच्या मुंग्या, भुंगे, टोळ, मधमाशा आणि वसंतात पळसाच्या फुलातील मधुरसही हा आवडीने चाखतो.
किटकांवर नियंत्रण ठेवतो.



Abhijit Avalaskar

## निलपंख

Blue jay

स्थानिक भटकंती

आकाराच्या मानाने डोके मोठे आहे, उडताना पंखातील निळी झाक दिसते



Nitesh Parulekar

## वेडा राघु

Small green bee-eater

स्थानिक भटकंती

हवाई कसरती करून किटक पकडतो



Nitesh Parulekar

## हूदहूद

Hoopoe

स्थानिक भटकंती

शेतकऱ्यांचा मित्र, उपद्रवी किटक खातो. याची पटकन ओळखता येणारी खूण म्हणजे डोक्यावरचा शेंडीसारखा तुरा.



Nitesh Parulekar

## खाटीक

## Rufous backed shrike

स्थानिक भटकंती

शेती प्रदेशात आढळणाऱ्या टोळ, नाकतोडे, बेडूक, सरडे, उंदराची पिल्ले यांची शिकार करतो.



Wikimedia

## भोरडी

## Rosy starling

हिवाळी स्थलांतर

पिकांचा फडशा पाडतात त्याचबरोबर उपद्रवी किटकांचा नायनाट अशी दुहेरी भूमिका पार पाडतात.



Wikimedia

## चातक

## Pied crested cuckoo

हिवाळी स्थलांतर

पावसाळ्यात म्हणजे साधारण जून-सप्टेंबरमध्ये दिसणारा हा पक्षी आहे. नैऋत्य मोसमी पावसावर ह्या पक्षाच्या हालचाली अवलंबून असतात.


Wikimedia

## पाकोळी
### Common swallow

हिवाळी स्थलांतर

घरटी काश्मीरमध्ये करतात, शेतीजवळच्या तारेवर हिवाळ्यात मोठ्या संख्येने आढळतात


Wikimedia

## युरेशियन चिमणमार
### Eurasian sparrow hawk

हिवाळी स्थलांतर

छोट्या पक्षांची शिकार करतो. शिक्रा पक्ष्याशी मिळताजुळता पण त्यापेक्षा लांब शेपूट.


Abhijit Avalaskar

## कापशी
### Black shouldered kite

स्थानिक भटकंती

शिकारी पक्षी, उंदीर, सरडे, टोळ,नाकतोडे यांचा फडशा पाडतो.



Satish Awate

## पिंगळा

### Spotted owlet

स्थानिक. निशाचर. हे छोटं घुबड घनदाट जंगल सोडून शिवार, जुनी झाडं, पडक्या इमारती, माळरान सर्व ठिकाणी सापडते. टोळ, भुंगे, सरडे, उंदीर, चीचुंद्र्या हे खाद्य असल्यामुळे हा शेतांची राखण करतो.



Wikimedia

## कोठीचे / गव्हाणी घुबड

### Barn owl

स्थानिक. निशाचर. जुन्या इमारती, शेतीचा प्रदेश, कडेकपारी, किल्ले अशा ठिकाणी राहतात. आवाज माणसाच्या किंचाळण्यासारखा येतो. पंखांचा आवाज न करता रात्री मळ्यात घुसून उंदीर, घुस, पकडतात.



Nilesh Waradkar

## शिपाई बुलबुल

### Redwhiskered Bulbul

स्थानिक भटकंती

शेताजवळील झाड-झुडपांच्या भागात आढळतो. डोक्यावर छोटा तुरा, गोड आवाज. मुख्य अन्न फुलातील मधुरस, किडे, सुरवंट, मुंग्या. शेतीला उपकारक.



## परसबागेतील पक्षी

घराच्या अंगणात फुलझाडांवर, झुडुपात आपल्याला नेहमी पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येतो. यापैकी अनेक पक्षी रानावनात तर सापडतीलच पण अनेक वर्ष माणसांच्या वसाहतीत राहण्याची सवय झाल्याने ते आपल्या आजूबाजूला पण सापडतात. चिमणी, कावळा, पोपट, कबुतर सारखे पक्षी माणसांनी टाकलेले खाण्याचे पदार्थ, धान्य खातात. त्यांच्या व्यतिरिक्त शिंपी, दयाळ, शिंजीर पक्षी ही दिसतात. गवत, गवती चहाच्या लांबलांब पाती चोचीने तोडून मुनिया जोडपं आजूबाजूच्या झाडावर घरट करत असतं. शिंजीर आणि फुलटोच्या शेवग्याच्या फुलातला मधुरस खात असतात. शिंपी पक्षी जास्वंद, पेरू, इतर लांब पानांच्या झाडावर आपले घरटे शिवत असतो. दुपारच्या वेळेत नीट लक्ष देऊन ऐकलं, बघितलं तर आपल्याला परसबागेत कमीत कमी ९ ते १० प्रकारचे पक्षी आपापली कामं करताना दिसतील.


N.A._Nazeer

## चष्मेवाला
## Oriental White - eye

स्थानिक भटकंती

नेहमी झाडावर असतो,
सहसा जमिनीवर येत नाही.
डोळ्याभोवती चष्म्यासारखी
दिसणारी पांढरी कडी. छोटे
किडे, फुलातला मधूरस खातो.


Kiran Morey

## ठीपकेवाली मुनिया
## Scaly-breasted Munia

स्थानिक भटकंती.
घोळक्याने राहतात. नर मादी
एकसारखे दिसतात. चोच
प्रामुख्याने गवताचे बी, शेतातले
धान्य खाण्यासाठी बनली आहे.
लहान किडे आणि घाणेरीची
लहान फळे ही खातात.


Wikimedia

## तांबट
## Coppersmith Barbet

स्थानिक भटकंती
वड, पिंपळ, पिंपरण, अंजीर,
जांभुळ या झाडावर दिसतो.
भांड्यावर ठोके देतात तसा
विशिष्ट आवाज काढतो. लहान
पिलांना वयस्क पक्ष्यांप्रमाणे
डोक्यावर लाल ठिपका नसतो.


Nitesh Parulekar

## दयाळ
### Oriental Magpie Robin

स्थानिक भटकंती

नर काळा कुळकुळीत, पोटावर पांढरा पट्टा असतो. मादी राखाडी रंगाची असते. नर सुरेल गातो. बहुतेक किडे आणि कधी कधी पाली, गोम, मासे खातात.


Koshy Koshy

## नाचण
### White - throated Fantail

स्थानिक भटकंती

हवेत सुळकांड्या, पिसे फुलवून नाचणं, गर्रकन वळणारा अतिशय उत्साही पक्षी. नर सुरेल शिट्टी वाजवतो. किडे हे मुख्य अन्न. नर – मादी सारखे दिसतात.


J M Garg

## फुलटोच्या
### Pale- billed Flowerpecker

स्थानिक भटकंती

फक्त ६.३ ग्रॅम इतके वजन, सिंगापूर चेरी सारखी छोटी फळे येणाऱ्या झाडांवर दिसतो. रानात झाडावर बांडगुळाची फळे खातो.



## लालबुड्या बुलबुल

### Red-vented Bulbul

स्थानिक भटकंती

अंगावर खवल्यासारखी पिसे, शेपटीच्या बुडाशी लाल पिसाचा झुबका. मुख्य अन्न– वेगवेगळी रसाळ फळे, फुलातील मधुरस, किडे, सुरवंट.



J. M. Garg

## भारद्वाज / कुंभारकावळा

### Greater Coucal

स्थानिक भटकंती

आकार डोमकावळ्या येवढा, लाल डोळे व लालसर चॉकलेटी पंख. किडे, सुरवंट, गोगलगायी, छोटे साप, फळे, दुसऱ्या पक्ष्यांची अंडी, पिल्ली खातो.



Satish Awate

## राखी धनेश

### Indian Grey Hornbill

स्थानिक भटकंती
फक्त भारतात सापडतो

वड, मोई, धामण, कांडळ या झाडांची फळे, गोगलगाय, विंचू, किडे आणि इतर पक्ष्यांची पिलेही खातो. आवाज पारी सारखा.



Kiran More

## राखी वटवट्या

## Ashy prinia

स्थानिक भटकंती

जमिनीलगत वाढणाऱ्या झुडपामध्ये, उंच गवतात दिसतो. मजबूत पाय, लांब शेपूट बऱ्याचदा वर केलेली दिसते. आवाजावरून वटवट्या हे नाव.



Gehan De silva Wijayratne

## शिंजीर

## Purple-rumped Sunbird

स्थानिक भटकंती

फुलातील मधुरस खाण्यासाठी स्पेशालीस्ट बाकदार सुईसारखी चोच, नराला चकाकणारा जांभळा रंग. मादीचे पोट फिकट पिवळसर अन पाठीवरचा भाग करडा.



Yathin Krishnappa

## शिंपी

## Common Tailorbird

स्थानिक भटकंती

हा पक्षी एक मोठे पान दुमडून किंवा दोन पाने टाके घालून पिशवीसारखे शिवतो म्हणून शिंपी पक्षी असे नाव.



Kiran Morey

## साळुंकी

## Common Myna

स्थानिक भटकंती

अतिशय धीट असा हा पक्षी बागेत, रस्त्यावर आणि शेतातही आढळतो. फळे, बिया, किडे, छोटे साप, गोगलगाय, असं वेगवेगळं खाणं खातो.



Kiran Morey

## सुभग

## Common iora

स्थानिक भटकंती

पाठीकडून काळा आणि पोटाकडून पिवळ्या रंगाच्या सुभगच्या पंखावर दोन पांढरे पट्टे असतात. सुरेल गातो. नर – मादी दोन्ही अंडी उबवतात.



Wikimedia

## पोपट

## Rose-ringed Parakeet

स्थानिक भटकंती

लाल चोच, फक्त नराच्या गळ्याभोवती काळा–गुलाबी पट्टा. धान्य, फळे, कळ्या खातात.



## वनक्षेत्र

महाराष्ट्रात अनेक प्रकारची जंगलं आहेत. नागपूर, चंद्रपूर,आणि गडचिरोली इकडची कोरडी तसेच दमट पानझडी जंगल, ठाणे, रत्नागिरी आणि इतर समुद्र किनाऱ्यावरची खारफुटी जंगलं, चांदोली, आंबोली व भीमाशंकर येथील निमसदाहरीत जंगलं, आणि मराठवाडा, खानदेशातील गवताळ भाग असणारी काटेरी माळरानं.
गरुड, हुमा घुबड, हरेल, हळद्या, तांबट, राखी धनेश, रातवा आणि असे अनेक पक्षी जंगलात राहतात. हे पक्षी बीजप्रसार, किड्यांवर नियंत्रण, परागीभवन अशी अनेक महत्वाची कामं त्यांच्या जंगलासाठी करत असतात.



Yuvraj Patil

## हरेल

## Yellow legged green pigeon

स्थानिक भटकंती

महाराष्ट्राचा राज्य पक्षी



Yuvraj Patil

## पाचु कवडा

## Emerald dove

स्थानिक भटकंती

वैशिष्ट्यपूर्ण पाचूसारखा पंखांचा रंग



Wikimedia

## चातक

## Pied crested cuckoo

हिवाळी स्थलांतर

पी...पी... पियु.... पी... पी... पियु असा आल्हाददायक आवाज काढतो.



Wikimedia

## नवरंग

## Indian pitta

हिवाळी स्थलांतर

मध्य महाराष्ट्रातून स्थलांतर, विविध रंगी पंखांमुळे नवरंग हे नाव सार्थ करतो



Wikimedia

## स्वर्गीय नर्तक

## Asian paradise flycatcher

स्थानिक भटकंती

नर पांढरा असून डोके काळे, वैशिष्ट्यपूर्ण लांबलचक पांढरी शेपूट. मादी तपकिरी रंगाची, शेपूट लांब नसते.



Wikimedia

## हळद्या

## Eurasian golden oriole

स्थानिक भटकंती

पिवळ्याजर्द रंगांच्या पंखांमुळे हळद्या हे नाव आले आहे



Santosh Chandran

## हुमा घुबड
## Scops owl

स्थानिक भटकंती

डोळ्यांच्या वरती
पिसांची शिंगे
असलेले मोठे घुबड.
दाट जंगलात, जुन्या
चिंचेच्या झाडात राहतात.



Satish Awate

## टिकेलचा निळा माशिमार
## Tickell's Blue Flycatcher

स्थानिक भटकंती

चिमणीपेक्षा थोडा मोठा.
जंगलात दाट झाडीत,
ओढ्याजवळ सावलीत
सापडतात. जिथे सावली
पडल्यामुळे त्याचा निळा रंग
पटकन दिसून येत नाही.



Sudhir Pandey

## लाल छातीचा माशिमार
## Red Breasted Flycatcher

स्थानिक. चिमणीपेक्षा छोटा
आकार. गोड आवाज.जंगलात
पाण्याजवळ, ओढ्याकाठच्या
झाडावर छोटं घरटं करतो.
नावाप्रमाणे खाद्य प्रामुख्यानं
उडणारे किडे आणि माशा.




# काही दुर्मिळ व अति संकटग्रस्त प्रजाती

महाराष्ट्रात असे काही पक्षी आहेत ज्यांची संख्या खूप कमी झाली आहे. त्याची वेगवेगळी आणि एकापेक्षा अधिक कारणं आहेत. माळढोक आणि तनमोराची शिकारही खूप झाली आणि त्यांना जगायला गरजेचे गवताळ भाग, झुडूपं व शेती असलेली मिश्र माळरानं पण संपत चाललेली आहेत.

कवड्या धनेश इतर धनेश प्रजातीप्रमाणे वर्षातून दोनच अंडी घालतो आणि त्यातले एकच पिलू वाचते. धनेश फक्त उंच झाडांवरच राहतात, खालती उतरत नाही. त्यामुळे त्यांना फिरायला आणि खाद्य शोधायला मोठी जंगलं लागतात. जंगलतोड, जंगलातून जाणारे हायवे आणि बोगदे आणि शिकारीमुळे या धनेशांची संख्या चिंताजनक झाली आहे.

भारतातल्या गिधाडांची संख्या गेल्या २०–३० वर्षात अचानक कमी झाली. यामागचे कारण डायक्लोफिनेक नावाचं औषध जे गुरांना ताप–अंगदुखीवरील उपचारासाठी दिलं जायचं. ही गुरं मेल्यावर गिधाडं त्यांचं मांस खायची आणि त्यातील डायक्लोफिनेकमुळे त्यांची किडनी खराब होऊन ती मरायची.

२००६ मध्ये या कारणाचा शोध लागल्यानंतर भारत सरकारने डायक्लोफिनेकच्या उत्पादनावर बंदी आणून त्याएवजी हानिकारक नसलेल्या 'मॅलोक्सीकॅम' नावाच्या औषधाच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले. त्यानंतर गिधाडांची संख्या थोडी स्थिरावली आहे, तरीही भारतीय गिधाड, पांढर पाठी गिधाड आणि बारीक चोचीचे गिधाड ही गिधाडे अतिसंकटग्रस्त आणि नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.


Wikimedia

**तणमोर**

Lesser florican

स्थानिक, फक्त भारतात सापडतो. शुष्क गवताळ प्रदेशाचा रहिवासी. नराला डोक्यावर तुरा, झळाळीदार काळी मान, पांढरे पंख आणि पिवळसर पाय तर मादी मातकट बदामी रंगाची असते.


Wikimedia

**कवडा धनेश**

Great hornbill

स्थानिक स्थलांतर

फक्त पश्चिम घाटातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, कोल्हापूर तसेच विदर्भात आढळतो. बोर, अंजिर, वड, पिंपळ, जांभूळ, करवंद याचबरोबर किडे, पाली, छोटे उंदीर सुध्दा खातो.



Nitesh Parulekar

## मोठा धनेश

## Malabar pied hornbill

स्थानिक स्थलांतर
फक्त पश्चिम घाटात

महाकाय जुनाट झाडांच्या ढोलीमध्ये तसेच देवरायांमध्ये असणाऱ्या जुनाट वृक्षांच्या ढोलीमध्ये आपले घरटे बनवतो.



Wikimedia

## माळढोक

## Great indian bustard

स्थानिक, फक्त भारतात सापडतो

मांसासाठी केलेली शिकार आणि राहण्याच्या ठिकाणांचा नाश यामुळे माळढोक या पक्ष्याचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. त्यामुळे याला अतिसंकटग्रस्त प्रजात म्हणून जाहीर केले आहे.



lip kee

## सारस क्रौंच

## Sarus Crane

हिवाळ्यात स्थलांतर
५ फूट किंवा अधिक उंचीचा मोठा, सुबक, रुबाबदार पक्षी. खूप शिकार झाल्यामुळे आणि पाणथळ जागांची ठिकाणं कमी होत चालल्याने याची संख्या घटत आहे. IUCN धोक्याची पातळी: 'असुरक्षित'



Wikimedia

## पांढरपाठ गिधाड

### Indian white-rumped vulture

स्थानिक भटकंती

गेल्या २० वर्षामध्ये भारतीय उपखंडातील ९० टक्के गिधाडे नष्ट झाली आहेत.



Wikimedia

## लांब चोचीचे गिधाड

### Long billed vulture

स्थानिक, फक्त भारतात सापडतो गिधाडांची संख्या लक्षणीय रित्या घटली असून अतिसंकटग्रस्त प्रजातीमध्ये त्यांची नोंद झाली आहे. या गिधाडाचे आता २ वेगळ्या प्रजातींमध्ये वर्गीकरण केले आहे– भारतीय गिधाड आणि लांब चोचीचं गिधाड.



Dr. Girish Jathar

## रान-पिंगळा

### Forest owlet

अतिशय संकटग्रस्त आणि नष्ट होण्याच्या मार्गावर असलेला हा पक्षी फक्त मध्य भारतातल्या सागवान असणाऱ्या जंगलात सापडतो. महाराष्ट्रात तोरणमाळ आणि तळोदाच्या जंगलात आढळतो.

## महाराष्ट्र जनुक कोश

महाराष्ट्र जनुक कोश या अभिनव प्रकल्पा अंतर्गत लोकं, संस्था आणि संशोधक एकत्र आले आहेत. परस्परांचे अनुभव, विचार आणि विज्ञानाची देवाणघेवाण करीत, राज्यातील उपयोगी झाडे–वेली, रानभाज्या, स्थानिक मासे, पिकांचे वाण, गाय, बकरी, कोंबडीच्या स्थानिक जाती, गवतं, माळरानावरचे पक्षी अशांचं संवर्धन करीत आहेत.

पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे हे या प्रकल्पा अंतर्गत २० हून अधिक सहकारी संस्थांच्या सहकार्याने जैवविविधता शिक्षण आणि माहितीच्या देवाणघेवाणीचे उपक्रम राबवीत आहे.

## पर्यावरण शिक्षण केंद्राविषयी

पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE) ही पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार समर्थित, पर्यावरण शिक्षणातील राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र आहे. मुले, तरुण, निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाच्या व्यक्ती आणि जनसामान्यांमध्ये पर्यावरणविषयक व शाश्वत विकासासाठी आवश्यक जागरूकता निर्माण करणे हे पर्यावरण शिक्षण केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी हे केंद्र विविध पथदर्शी शैक्षणिक उपक्रम व साहित्य विकसित करते.


**संकल्पना व संपादन–** सतीश आवटे

**शोध व लेखन–** अपराजिता राजवाडे, सुहास वायंगणकर

**सूचना, टिप्पणी–** स्वप्नील नेवाळे, युवराज शिंगटे, अभिजीत कांबळे श्रुति कुलकर्णी, भिमाशंकर ढाले.

**ग्राफिक डिझाईन–** अशोक थोरवे

**टायपिंग–** राजेंद्र शिवगण

**चित्रे –** नितेश परुळेकर, विपुल बत्तुल



**पर्यावरण शिक्षण केंद्र**

१, पाईनवूड अपार्टमेंट, सर्व्हे नं. २३३/१/२, विधाते कॉलनी, औंध, पुणे ६७.

फोन: ०२०–२७२९८८६१/६०/६२. ईमेल: mgb@ceeindia.org



**महाराष्ट्र जनुक कोश प्रकल्पास राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन यांचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.**